NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषयः— एम.फिल./पीएच.डी.कोर्सवर्क ऑनलाईन पध्दतीने आयोजित करणेबाबत.**

**संदर्भः— UGC Guidelines on Examinations and Acadmic Calendar in view of** COVID-19 Pandemic **Ref. No. D.O. No.F.1-1/2020(Secy) dated 29th April, 2020**

सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, पदव्युत्तर अधिविभाग यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2019–20 तसेच त्यापूर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांचे एम.फिल./पीएच.डी. कोर्सवर्क आयोजित करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. पुढील आदेश होईपर्यंत सर्व संबंधित अधिविभाग/संशोधन केंद्र यांनी एम.फिल./पीएच.डी. कोर्सवर्कचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्याकरिता युजीसी, नवी दिल्ली यांचे दि. 29 एप्रिल, 2020 तसेच दि. 22 सप्टेंबर, 2020 रोजीच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याच्या अटीवर तसेच सद्यस्थितीत विद्यार्थ्यांची सुरक्षितता व त्यांचे शैक्षणिक हित जोपासण्याच्या दृष्टिकोनातून यासंदर्भात कार्यवाही करणेत यावी.

**एम.फिल./पीएच.डी. कोर्सवर्क आयोजनाबाबत खालील निकषानुसार कार्यवाही करावी.**

1. COVID-19 Pandemic च्या पार्श्वभूमीवर, युजीसी, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक निकषानुसार एम.फिल. /पीएच.डी. कोर्सवर्क Online पध्दतीने घ्यावा. शक्यतो कोर्सवर्कचा जास्तीत जास्त भाग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत कार्यवाही करावी.
2. एम.फिल./पीएच.डी. कोर्सवर्ककरिता त्या–त्या विषयातील विद्यार्थ्यांची यादी तयार करून संबंधित विद्यार्थ्यांना ईमेल/फोनव्दारे एम.फिल./पीएच.डी. कोर्सवर्कचे वेळापत्रक कळवावे. ऑनलाईन यंत्रणेव्दारे आयोजित करावयाच्या कोर्सवर्क संदर्भात, संबंधित विद्यार्थ्यांकडे आवश्यक ती तांत्रिक यंत्रणा उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी.
3. त्या–त्या विषयांचे कोर्सवर्कचे वेळापत्रक तज्ञांच्या यादीसह पीजीबीयुटीआर विभागाकडे पाठवून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.
4. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी एम.फिल./पीएच.डी. कोर्सवर्क ऑनलाईन पध्दतीने पूर्ण केले असल्याबाबत संबंधित अधिविभागांनी/संशोधन केंद्र यांनी त्यांचे कार्यालय पातळीवर याचे अद्यावत रेकॉर्ड ठेवावे.
5. तज्ञ व्याख्यानांचे मानधनाचे बिल पीजीबीयुटीआर विभागाकडे (संबंधित विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन उपस्थिती नोंदवून या सर्व रेकॉर्डसह) मान्यतेसाठी पाठविणे.

आदेशावरून,

कुलसचिव

जा.क्र. शिवाजी विद्या./पीजी–बीयुटीआर/एम.फिल–पीएच.डी./2833

दि. 5 NOV 2020

प्रत –

१. सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२. सर्व प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालय/मान्यता प्राप्त संस्था.
३. मा. कुलगुरू कार्यालय, मा. कुलसचिव कार्यालय.
४. इंटरनेट विभाग यांना सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत योग्य त्या कार्यवाहीसाठी
५. सुरक्षा विभाग

**(महत्वाची सुचना : एम.फिल./पीएच.डी. विद्यार्थ्यांनी तसेच संबंधीत मार्गदर्शक यांनी पीजीबीयुटीआर विभागाशी निगडीत अधिकृत माहितीकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट दयावी. )**